Vol 5 Issue 5 June 2015

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

Indian Streams Research Journal

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

Welcome to ISRJ

RNI MAHMUL/2011/38595 **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

.....More

Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India
Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org

International Recognized Double-Blind Peer Reviewed Multidisciplinary Research Journal
Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850 Impact Factor : 3.1560(UIF)
Volume - 5 | Issue - 5 | June - 2015 Available online at www.isrj.org

''राजर्षी शाहू : वसतिगृहात्मक शिक्षणाचे शिल्पकार''

गीता बी. नेहते
इतिहास विभाग प्रमुख कला, वाणिज्य व गृहविज्ञान महिला महाविद्यालय, जळगांव.

Short Profile

Geeta B.Nehte is Head at Department of Art History in College of Commerce and Gruhvidhyan Mahila Mahavidhyalay , Jalgaon .

सारांश :
आधुनिक महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनाला ज्यांचे कर्तुत्व प्रामुख्याने कारणीभूत झाले अशा थोर पुरूषांच्या मालिकेत राजर्षी शाहू छत्रपतीची गणना केली जाते. महाराष्ट्रात गेल्या काही दशकांत जी स्थित्यंतरे घडून आली त्याचे श्रेय शाहू राजांच्या प्रेरणेने सुरू झालेल्या धार्मिक, सामाजिक, राजकीय व शैक्षणिक प्रबोधनाच्या चळवळीला द्यावे लागते. महाराजांची भूमिका ही तत्वचिंतकाची आणि कृतिशील समाजसुधारकांची होती. त्यांच्या कार्याची श्रेष्ठता व व्यापकता लक्षात घेता यामागील त्यांची प्रेरणा कोणती होती ? सामाजिक व शैक्षणिक जिव्हाळा वाटावा असा कोणता विचार त्यांच्या मनाला जागृत करीत होता ? यासंबंधी विशेषत्वाने चिकित्सा करणे आवश्यक आहे. महात्मा फुले, दयानंद सरस्वती, आगरकर, न्या. रानडे, ना. गोखले, डॉ. भांडारकर, राजाराम मोहनरॉय यांनी समाजाबद्दल सहानुभूती दाखवून हालअपेष्टा सहन करून सामाजिक प्रबोधन व परिवर्तन करण्याचे प्रयत्न केले. अशा अनेक व्यक्ती व संस्थांचा कमी-जास्त प्रमाणात प्रभाव त्यांच्यावर पडलेला होता.

प्रस्तावना

छत्रपती शाहूंच्या जीवनाचा स्थायिभाव शिक्षणप्रसार हा होता. चळवळीच्या धामधूमीच्या काळातही त्यांनी शिक्षण प्रसार दृष्टीआड होवू दिला नाही. राज्य कारभार हाती घेतल्यापासून ते महानिर्वाणापर्यंत (इ.स.१८९४ ते १९२२) अशी २८ वर्षे शाहूंनी शिक्षणाचा निदिध्यास घेवून कोल्हापूरात अनेक वसतिगृहे स्थापन केली. वसतिगृहात्मक शिक्षणाची चळवळ सुरू करून सर्व समाजाच्या मुलांना एकत्रित ठेवून शैक्षणिक विकास साधावा हा

त्यांचा विचार होता. यातून समाजाची एकसंघ बांधणी हे मुख्य सूत्र देखील विसरता येणार नाही. याचा थोडक्यात आढावा या शोध निबंधात घेतला आहे.

पराक्रम आणि मुत्सद्देगिरीच्या जोरावर जी राजपूत घराणी दक्षिणेकडे आली त्यामध्ये कागलकर घाटगे हे घराणे अग्रेसर मानले जाते. या घराण्यातील जयसिंगराव – राधाराणी या दापंत्याला २६ जुलै १८७४ रोजी पुत्ररत्न झाले. त्यांचे यशवंत हे नामविधान करण्यात आले आणि त्याने पुढे ते सार्थ केले. १७ मार्च १८८४ हा दिवस करवीरच्या इतिहासाला नवे वळण देणारा ठरला. या दिवशी घाटगे कुलोत्पन्न यशवंतराव यास मातोश्री आनंदीबाईंनी विधीपूर्वक दत्तक घेवून 'शाहू' हे नाव ठेवले. पुढे २ एप्रिल १८९४ पासून करवीर राज्याचा सर्वाधिकार शाहूंनी स्वीकारला.[१]

आमची सर्व प्रजा सतत तृप्त राहून सुखी असावी तिचे कल्याणाची वृद्धी व्हावी व आमच्या संस्थानाची हरएकप्रमाणे सदोदीत भरभराट होत जावी अशी आमची उत्कट इच्छा आहे, हा आमचा हेतू परिपूर्ण करण्यास आपल्या पदरचे सर्व लहानथोर जहागीरदार, कामगार, व्यापारी आदिकरून तमाम प्रजाजन शुद्ध अंतकरणापासून मोठ्या राज्यनिष्ठेने आम्हास सहाय्य करतील आणि आमची पूर्ण उमेद आहे. ही आमची कारकीर्द दिर्घकालापर्यंत चालवून सफल करावी अशी मी त्या जगन्नियंत्या परमात्माची एकमेव प्रार्थना करतो.[२] हा जाहिरनामा प्रसिद्ध केला आणि आपल्या दूरदृष्टीचे व मूलभूत विचारसरणीचे दर्शन घडविले.

शाहू पूर्वकालीन शिक्षण :

इंग्रजांच्या राजवटीतील इंग्रजी शिक्षणामुळे भारतीय तरूणांच्या विचारांना चालना मिळाली. अज्ञान, अंधश्रद्धा व अनिष्ट रूढीमुळे आपण कसे भरडले जात आहोत यांचे त्यांना ज्ञान होवू लागले व त्यातूनच समाजसुधारणेचे पर्व सुरू झाले. स्वामी दयानंदानी आर्य समाजाची मुहूर्तमेढ रोवली. महात्मा ज्योतीबा फुलेंनी समतेचा झेंडा रोवला. डॉ. भांडारकरांचा प्रार्थना समाज कार्यरत झाला. लोकहितवादींनी अज्ञानावर ताशेरे ओढले. न्या. रानडे यांनी 'जुने त्यागावे नवे ते घ्यावे' हा घोष केला. गोपाळ गणेश आगरकरांनी सनातन्यांच्या प्रतिगामी कृतीवर प्रखर टिकास्त्र सोडले. यामुळे समाज परिवर्तनाच्या चक्राला गती मिळू लागली. समाजाची ती स्थिती सुधारण्यासाठी व वैचारिक प्रगल्भता निर्माण करण्याच्या दृष्टीने इग्रजी भाषेचे ज्ञान सहाय्यक ठरले.[३]

इंग्रज राजवटीतील भारतीय शिक्षणाची दिशा :

इ.स. १८१८ मध्ये इंग्रजी राज्य खऱ्या अर्थाने प्रस्थापित झाले. त्यानंतर इ.स.१८२२ मध्ये तत्कालीन गव्हर्नर माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन यांनी बॉम्बे नेटिव्ह स्कूलची स्थापना केली. भारतीय लोकांना त्यांच्या भाषेत शिक्षण घेण्यासाठी मुंबईत शाळा काढल्या व अशाप्रकारे इंग्रजी राजवटीतील बॉम्बे प्रेसिडेन्सी भागातील शिक्षण प्रक्रिया सुरू झाली. इ. स. १८२५ मध्ये पुण्याच्या हिंदू कॉलेजमध्ये इंग्रजी शिक्षणाची सुरूवात झाली आणि इ.स. १८४५ पर्यंत एकूण १० शिक्षणशाखा अनुदानप्राप्त झाल्या. शाहूपूर्व काळात इंग्रजांनी केलेल्या शैक्षणिक सुधारणांचा आढावा घेतला तर काही ठळक बाबी म्हणजे लॉर्ड मेकॉलेचा शिक्षणाचा झिरपता सिद्धांत, इ.स. १८५४ चा वुडस खलिता, इ.स. १८८२ चे हंटर कमिशन या होत.४ परंतु या धोरणांना विशेषतः शिक्षणाच्या झिरपत्या सिद्धांताला इ.स.१८७० मध्ये महात्मा फुलेंनी जोरदार विरोध केला. कारण आधी कळस मग पाया प्रथम खालच्या वर्गातील लोकांना शिक्षण दिले पाहिजे म्हणजे आधी पाया मग कळस असे फुलेंचे मत होते. या सर्व वैचारिक लढाईच्या काळात म्हणजेच शाहूपूर्व काळात कोल्हापूर संस्थानाची अस्थिरता, सामर्थ्य, राजांचा अभाव यामुळे शिक्षणाची एकूण स्थिती चिंताजनक होती.

शाहूपूर्व काळातील कोल्हापूर संस्थानाची शैक्षणिक स्थिती :

शाहूपूर्व काळात शिक्षणाबाबत संस्थान क्षेत्रात काहीच कार्य झाले नाही असे नाही. शाहूपूर्व काळातील

छत्रपती बाबासाहेब महाराज (इ.स.१८४४ ते १८६६) आणि छत्रपती राजाराम महाराज तथा नागोजीराव पाटण (१८६६ ते १८७०) यांचे कार्य महत्त्वाचे आहे. कोल्हापूर संस्थानात या काळात १२२ खाजगी शाळांतून १८२८ विद्यार्थी शिकत होते. कोल्हापूर संस्थानातील पन्हाळा, कागल, बावडा, शिरोळ, गडहिंगलंज, भुदरगड, आळते व मलकापूर या भागात मराठी शाळा होत्या आणि त्यावर प्रशासक म्हणून श्री. नारायण रामचंद्र करंदीकराची नियुक्ती करण्यात आली होती. इ.स. १८५३ मध्ये पहिली मुलींची शाळा स्थापन झाली. त्यातील छत्रपती बाबासाहेब महाराजांचे योगदान मोठे होते. परंतु हे शिक्षण फक्त श्रीमंतांच्या मुलांनाच सहज शक्य होते व सर्व शिक्षण मराठीतून चालत असे. इ.स. १८६१ मध्ये कोल्हापूरात पहिली इंग्रजी शाळा सुरू झाली. त्यात १९ विद्यार्थी शिकत होते. पुढे १८६३ मध्ये फक्त सरदारांच्या मुलांसाठी शाळा सुरू होवून त्यात ९ विद्यार्थी शिकत होती. यावेळी मिस्टर ग्रॅट यांच्या शिफारशीनुसार कोल्हापूर संस्थानातील बाळ पंडीत हे शिक्षणाधिकारी म्हणून नेमण्यात आले. पुढे मात्र इंग्रजी शिक्षणात वाढ होवून सरकारच्या वतीने ३२ इंग्रजी-मराठी शाळा १८७० पर्यंत स्थापन झाल्या. इ.स. १८६७ मध्ये कोल्हापूरात पहिले हायस्कूल स्थापन झाले व श्री. महादेव कुंटे हे पहिले मुख्याध्यापक झाले. इ.स. १८७० पर्यंत या हायस्कूलमधील विद्यार्थी संख्या २५३ पर्यंत गेली. त्यात सरदार, जहागीरदाराचीही मुले होती. छत्रपती राजाराम महाराजांनी शिक्षणाबाबत आपले विचार अगदी सुस्पष्ट मांडले आहेत. ते म्हणतात, 'शिक्षण ही एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. सामान्यापर्यंत हे शिक्षण पोहचले पाहिजे. यासाठी मी दक्ष राहीन. आज शिक्षणाला जे उत्तेजन दिले जात आहे हे कधीही कमी करू दिले जाणार नाही. या शिक्षणातून लोकांनी परंपरागत अंधविश्वासातून मुक्त व्हावे.[५]

सन 1894 नंतर बदलती शैक्षणिक स्थिती :

शाहू महाराज इ.स.१९८४ ला गादीवर आले. ही कोल्हापूर संस्थानाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची घटना ठरली. याचे महत्त्व सांगतांना करवीर रियासतकार वर्णन करतात की, "The Brightest morning of Karveer State of Modern Period."[६] शाहू महाराजांनी केलेले नेत्रदिपक कार्य विविधांगातील असले तरी शैक्षणिक व सामाजिक उत्थानाचे एक नवे पर्व सुरू करण्यातील त्यांचे योगदान लक्षणीय आहे.

प्रत्यक्षात शाहू महाराजांनी राज्यकारभार हाती घेतला तेव्हा एकूण संस्थानाची शैक्षणिक स्थिती सोचनीय होती. सर्व जहागिरीतील शाळा जमेस धरून अवघ्या २२४ शाळा व १४,८१९ विद्यार्थी होते.[७] बहुतांश समाज वर्ग शिक्षणापासून दूर होता. ही स्थिती सुधारून अधिकाधिक लोकांपर्यंत शिक्षण पोहचविण्याच्या दृष्टीने महाराजांनी प्रयत्न सुरू केले. इ.स. १८९५ मध्ये त्यांनी राजाज्ञा काढून उच्च दर्जाचे शिक्षणाधिकारी पद निर्माण केले.[८] आणि तेथून पुढे विविध शिक्षण तज्ज्ञांच्या विचाराने त्यांनी वाटचाल सुरू करून कोल्हापूरला महाराष्ट्रातील एक महत्त्वाचे व प्रेरणादायी शैक्षणिक केंद्र बनविले. शैक्षणिक प्रसारासाठी त्यांनी ज्या अनेकविध योजना राबविल्या त्यापैकी सर्वात प्रभावशाली आणि समाजोन्मुख योजना म्हणजे 'वसतिगृहांची स्थापना होय.'

वसतिगृहाची स्थापना :

शाहू महाराज उदारमतवादी शिक्षणाचे प्रणेते होते. त्यांना सर्व समाजाला साक्षर करावयाचे होते. काही प्रमाणात प्राथमिक शाळा स्थापन झाल्याने शिक्षणाची सोय झाली असली तरी उच्च शिक्षणाच्या सोयी ग्रामीण भागापर्यंत पोहचविणे अवघड होते. त्यात समाजाचे दारिद्र्य, जातीभेद इ. मुळे अनेक होतकरू, हुशार विद्यार्थ्यांची इच्छा असूनही शिक्षण घेणे शक्य होत नाही हे लक्षात घेवून शाहू महाराजांनी इ.स. १८९६ साली सर्व जाती जमातीसाठी वसतिगृह स्थापन केले. त्यांनी स्थापन केलेल्या वसतिगृहाला 'बोर्डींग' हा शब्द सुरू झाला. या योजनेतंर्गत पुढे असे लक्षात आले की, ब्राह्मण जाती व्यतिरिक्त एकही विद्यार्थी न आल्याने त्या योजनेचा मूळ हेतू मागे पडून त्यांचा तो प्रयोग अयशस्वी ठरला. यावर उपाय म्हणून महाराजांनी केवळ मागासलेल्या जाती-जमातींसाठी वसतिगृह किंवा बोर्डिंग स्थापण्याचे ठरविले. वडगावचा पांडुरंग चिमणाजी पाटील हा मुलगा मॅट्रीकची परीक्षा पास झाल्यावर पन्हाळ्यावरील दत्तमंदिरात पहिले वसतिगृह स्थापन करून त्यांची पुढील

शिक्षणाची सोय केली. सातारचे पी. के. शिंदे, तासगावचे आर. आर. पवार हे विद्यार्थी याच वसतिगृहात रहात असत. पुढे हे वसतिगृह कोल्हापूरला स्थलांतरित झाले.[९]

शिक्षणासाठी वसतिगृहाची स्थापना हा एक अभिनव उपक्रम होता. केवळ मुंबई इलाख्यातच नव्हे तर पूर्ण हिंदूस्थानात अशी सोय नव्हती. मोठमोठ्या शैक्षणिक केंद्रामध्ये एखाद्या जातीकडून किंवा पंथाकडून चालविले जाणारे हॉटेल्स होते. परंतु सर्व जातींना सामावून घेणारे, भोजन व निवाऱ्याची एकत्र सोय असणारी वसतिगृहे महाराजांनी स्थापन केले व कोल्हापूर हे 'वसतिगृहाचे मोहोळ' बनवून टाकले. कोल्हापूर म्हणजे 'विद्यार्थी वसतिगृहाची माता' असे महाराज अभिमानाने म्हणत. १५ एप्रिल १९२० रोजी नाशिक येथील उदाजी मराठा वसतिगृहाची कोनशिला बसवितांना ते म्हणाले की, ''ब्रिटिश पार्लमेंटला मदर ऑफ पार्लमेंटस्'' असे म्हणतात. यात त्यांना अभिमान वाटतो.[१०] अस्पृश्यांचा अस्पृश्यपणा काढून टाकण्यामध्येही कोल्हापूरच्या लोकांनी पुढाकार घेतला आहे. अशी कृतार्थ भावना त्यांनी व्यक्त केली. त्यामागे त्यांची २५ वर्षाची तपश्चर्या होती.[११]

वसतिगृह स्थापण्यामागील राष्ट्रीय दृष्टी :

शाहू महाराजांची वसतिगृह काढण्यामागची दृष्टी राष्ट्रीय होती. त्यांना त्यांच्या कार्यात लगेच यश आले असे नाही तर अनेक निराश करणाऱ्या प्रसंगातून, अडचणीतून त्यांनी मार्ग काढला आहे. त्यासाठी त्यांना अनेक समाजसुधारकांची विचारांची शिदोरी उपयोगी ठरली. त्यांनी काही जातवार बोर्डिंगही काढले. त्याबद्दल त्यांच्यावर टिकाही झाली. पण ह्यामागील दृष्टीकोन स्पष्ट करतांना कोल्हापूर येथील आर्य क्षत्रिय परिषदेच्या १५ ऑगस्ट १९२० च्या अधिवेशनात ते म्हणाले की, ''जातीभेद हा हिंदूस्थानला लागलेला मोठा रोग आहे. पण जातीचा अभिमान मर्यादित असावा. ज्या समाजात आपण वाढलो त्या समाजची उन्नती करण्याची काळजी वाहणे हे योग्य आहे. पण त्या समाजाबाहेरही एक मोठा समाज आहे. त्यांची सेवाही आपण केली पाहिजे. आपला जातिभिमान हा राष्ट्रकार्याला पोषक असावा. तो राष्ट्रसेवा नजरेआड करणारा नसावा.''[१२] या जाणिवेतून जाती परिषदा भरविणे, जाती बोर्डिंग काढणे व त्यातून चारित्र्यसंपन्न व सुसंस्कृत नागरिक घडवून वैचारिक जडणघडणीतून जातीव्यवस्था हळूहळू कमी करणे हे शाहू महाराजांचे धोरण होते. या धोरणासाठी विद्यार्थी वर्ग अधिक उपयोगी ठरेल हे लक्षात घेवून त्यांनी कोल्हापूरात सुमारे २०-२२ बोर्डिंग स्थापन केल्यात.

व्हिक्टोरिया मराठा वसतिगृह (बोर्डिंग) :

इ.स.१८९६ ला सर्व जातीसाठी एक वसतिगृह काढण्याचा प्रयत्न अयशस्वी झाल्यानंतर प्रत्येक जातीची वसतिगृह काढण्यास इ. स. १९०१ पासून सुरूवात झाली. त्यापैकी पहिले वसतिगृह म्हणून याला 'वडिलबहिण' म्हणून मान दिला. १८ एप्रिल १९०१ ला मराठा एज्युकेशन असोसिएशनची व सामाजिक वसतिगृहाची स्थापना श्रीमंत दत्ताजीराव घाटगे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आली. त्यात श्रीमंत मामासाहेब खानविलकर, श्रीमंत आप्पासाहेब म्हैसाळकर, भास्करराव जाधव, बाजीराव विचारे, जिवाजीराव सावंत इ. मंडळी होती. यास २५ हजार रूपये किंतीची इमारत, सालिना २०००/- रूपये उत्पन्नाच्या जमिनी व ५५०/- रूपये वार्षिक ग्रॅंट देण्यात आली होती. तसेच बोर्डिंग ठेवीवर ८ टक्के व्याज देण्यात येत होते. यामध्ये फक्त मराठा विद्यार्थी नसून मुसलमान, ब्राह्मण, शिंपी व अस्पृश्य मुलेही होती. त्यांच्या दिवाबत्ती, केशकर्तन, धोबी इ. खर्च संस्था करीत असे. त्यात एकूण ३०० विद्यार्थी होते. सुप्रसिद्ध शेतीतज्ज्ञ डॉ. पी. सी पाटील यांना बोर्डिंगचा पहिला लाभ मिळाला होता. इ. स. १९११ मध्ये शिक्षणासाठी त्यांना अमेरिकेत पाठविले होते. या वसतिगृहातून गुलाबराव पाटील, ग. ल. ढोकळ, पी. बी. साळुंखे यासारखे नामवंत व गुणवंत विद्यार्थी तयार झाले. यासाठी छत्रपती राजाराम महाराजांनी ४०० एकर जमीन दिली. वसतिगृहाच्या पुढे नावात बदल करून ''श्री शाहू छत्रपती विद्यार्थी वसतिगृह'' असे नाव ठेवले.[१३]

जैन बोर्डिंग :

या बोर्डिंगचा शुभारंभ एप्रिल १९०१ मध्ये होवून यासाठी महाराजांनी दसरा चौकातील जमीन सालिना ३५०/- रूपये ग्रॅट दिली. १९०४ साली कोनशिला व १९०५ साली इमारत उद्घाटन महाराजांच्या हस्ते झाले. मुंबईचे शेठ माणिकचंद हिराचंद यांनी २४ खोल्यांची इमारत बांधून दिली. १२ मार्च १९०९ रोजी युवराज राजाराम यांचे हस्ते बोर्डिंगच्या आवारात धर्मशाळा, भोजनगृह इ. इमारतीच्या कोनशिला बसविण्यात आल्या. राजाराम महाराजांनी या बोर्डिंगकरिता लक्ष्मीपुरीतील तीन प्लॉटस व ब्लॉक्स दिले होते. गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना बोर्डिंगकडून स्कॉलरशिप देण्यात येते. या वसतिगृहातून कर्मवीर भाऊराव पाटील यासारखे नामवंत विद्यार्थी तयार झाले.[१४] सन १९१२-१३ साली चित्रकलेच्या विशेष अभ्यासासाठी वसतिगृहाच्या वतीने विद्यार्थ्यांना इटली देशात पाठविण्यात आले होते. तर १९२१-२२ साली वसतिगृहात ५० विद्यार्थी होते व ३८०/- रूपये वार्षिक अनुदान मिळत होते.[१५]

लिंगायत बोर्डिंग :

शाहू महाराजांच्या प्रेरणेने लिंगायत समाजातील पुढाऱ्यांनी सन १९०६ साली वसतिगृह सुरू केले. यासाठी संस्थानाच्या वतीने २५०/- रूपयांची ग्रॅट सुरू झाली. राजाराम महाराजांनी शनीवार पेठेत १२५' X १००' ची जागा दिली व वसतिगृह सुरू केले. पुढे दसरा चौकात चित्रदुर्ग मठाजवळच्या जागेत दुमजली इमारत बांधून दिली व ती आजही तेथेच आहे. माजी उपराष्ट्रपती मा. बी. डी. जत्ती, पंजाबचे राज्यपाल डी. सी. पावटे यासारखे नामवंत विद्यार्थी येथून तयार झाले.[१६]

मुस्लिम बोर्डिंग :

इ. स. १९०२ पासून बोर्डिंग काढण्याचे योजले जात होते, पण प्रत्यक्षात कृती मात्र शाहू महाराजांनी दि. १५/११/१९०६ रोजी मोहामेंडन एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून मुस्लिम पुढाऱ्यांमार्फत बोर्डिंग काढले व त्यासाठी दसरा चौकातील २५०० चौरस फुट जागा व २५०/- रूपये ग्रॅट दिली. इमारत फंडास म्हणून ५,५००/- रूपये देणगी दिली.१७ या संस्थेचे स्वतः महाराज पदसिद्ध अध्यक्ष राहिले. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी २००/- रूपयांची देणगी दिली. भावनगरचे भाऊसिंगजी महाराजांनी या वसतिगृहास भेट देवून २००/- रूपयेची देणगी दिली. या बोर्डिंगचा पायाभरणी समारंभ महाराजांचे गुरू सर फ्रेजर याचे हस्ते दि. ३१/०१/१९२० रोजी झाला. याच वसतिगृहाच्या आवारात उर्दू-मराठी हायस्कूल चालू करण्यात आले.[१८]

अस्पृश्य बोर्डिंग (मिस्क्लार्क हॉस्टेल) :

अस्पृश्य समाजासाठी वसतिगृह नाही हे ध्यानात घेवून महाराजांनी १४ फेब्रुवारी १९०८ रोजी रविवार पेठ येथे २००' X १५०' जागेवर २५ खोल्यांची इमारत उभी करून दिवाण बहादूर अण्णसाहेब लठ्ठे यांच्या अध्यक्षतेखाली या वसतिगृहाची स्थापना केली व ५५७/- रूपये ग्रॅट दिली. मुंबई प्रांताचे गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क यांच्या कन्या यांनी यास भेट देवून ५०००/- रूपयाचे सहाय्य केले. त्यामुळे शाहूंनी या वसतिगृहास त्या कुमारकिचे नाव दिले. यात १०० अस्पृश्य व इतर वर्गातील मुले होती. डॉ. डि. एस्. पोवार हे वसतिगृहाचे चेअरमन होते.[१९]

दैवत शिक्षण समाज बोर्डिंग :

सोनार समाजातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणास मदत करण्यासाठी २४ डिसेंबर १९०८ रोजी स्थापन झाले. इ.

स. १९१४ मध्ये मंगळवार पेठेतील जागा देवून वसतिगृहाची स्थापना केली. वार्षिक १८०/- रूपये ग्रॅंट दिली. जेवण मोफत देवून मोठ्या प्रमाणात शिष्यवृत्त्याही दिल्यात. त्यावेळी ३० विद्यार्थी शिकत होते.[२०]

नामदेव बोर्डिंग :

२ एप्रिल १९११ मध्ये युवराज राजाराम व प्रिन्स शिवाजी यांचे हस्ते बोर्डिंगची स्थापना करण्यात आली. शूक्रवार पेठेतील प्रशस्त जागा व सालिना ५०/- रूपये ग्रॅंट मंजूर करण्यात आली. मुंबईचे माजी मेयर व आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट पुढारी कॉ. एस. एस. मिरजकर व माजी आमदार राजाराम बगाडे हे या वसतिगृहाचे विद्यार्थी होत.[२१]

पांचाळ बोर्डिंग :

मुस्लिम हॉस्टेलच्या पिछाडीस १२०' X १८०' जागेवर या वसतिगृहाची स्थापना इ. स. १९१२ मध्ये करण्यात आली. यास सालिना १००/- रूपये ग्रॅंट देण्यात आली. सर्व जाती धर्माची मिळून एकूण ३० विद्यार्थी या वसतिगृहात होते.[२२]

सारस्वत ब्राह्मण वसतिगृह :

दसरा चौकात २० मे १९१५ रोजी यांची स्थापना करण्यात आली. सालिना ४०/- रूपये ची ग्रॅंट व १६०० रूपयाची देणगी दिली. श्रीमती सरस्वतीबाई गणेश लाटकर यांनी रूपये १०,०००/- ची देणगी दिली म्हणून ह्यांचे नाव या वसतिगृहास देण्यात आले. सर्व जाती धर्माच्या मुलांना प्रवेश देण्यात आला. एकूण २० विद्यार्थी होते. प्रसिद्ध शिक्षण तज्ज्ञ व सरकारचे सल्लागार श्री. जे. पी. नाईक हे या वसतिगृहाचे विद्यार्थी होते.[२३]

रावबहाद्दूर सबनीस प्रभू बोर्डिंग :

सप्टेंबर १९१५ रोजी रावबहाद्दूर सबनीस यांचे नजरेखाली या वसतिगृहाची स्थापना झाली व ६००/- रूपये रोख दिले. ५०/- रूपये वार्षिक ग्रॅंट दिली. एकूण ३८ विद्यार्थी रहात होते.[२४]

आर्यसमाज गुरूकुल :

१८ मार्च १९१८ रोजी याची स्थापना करण्यात आली. यामार्फत मोफत प्राथमिक आणि माध्यमिक शाळा काढण्यात आल्या. पद्माळा तलावाजवळची १५ एकर जमीन व ६१००/- रूपये रोख दिले. १५० विद्यार्थी यात शिकत होते. माजी खासदार के. एल. मोरे हे यांचे स्नातक होते. यांचेवेळी वैश्यं बोर्डिंगची इ. स. १९१८ ला स्थापना झाली. त्याला २००/- रूपयाची देणगी देण्यात आली. वैश्य लोकांनी दिलेल्या देणगीतून ४०० चौ. फुट जागेवर दुमजली इमारत बांधण्यात आली.[२५]

ढोर–चांभार बोर्डिंग :

या बोर्डिंगची स्थापना १९१९ ला झाली. अस्पृश्य जमातीमध्ये अनेक भेद आहेत हे ओळखून निराळे बोर्डिंग स्थापन केले. तसेच नंतर १९२०-१९२१ रोजी शिवाजी वैदिक विद्यालय वसतिगृह स्थापन करण्यात आले. ही एकमेव अशी वैदिक धर्मविधीचे सशास्त्र शिक्षण देणारी भारतातील संस्था होती.[२६]

प्रिन्स मराठा बोर्डिंग हाऊस :

दिनांक १ जुलै १९२० रोजी शिवाजी पेठेत हे वसतिगृह चालू केले. यातील मुले माधुकरी मागून व वार लावून शिक्षण घेत असत. कोळी शाळेची इमारत व ७००/- रूपये देणगी दिली होती. ४०० विद्यार्थी व १५ विद्यार्थींनी रहात असत. महाराष्ट्राचे माजी गृहमंत्री बाळासाहेब देसाई, संपतराव पाटील (कॉम्रेड) नागनाथ नायकवाडी हे विद्यार्थी होते.[२७]

सुतार बोर्डिंग :

दंकाळ्याजवळील तपोवन येथे ६५' x ५०' जागेवर दिनांक ६ जून १९२१ रोजी स्थापन केले. याचवेळी २५ जुलै १९२१ रोजी १५०/- रूपये ग्रॅंट देवून श्रीसेना नाभिक विद्यार्थी वसतिगृह चालू केले. सोमवंशीय आर्यक्षत्रिय बोर्डिंग दिनांक १५ ऑगस्ट १९२० रोजी स्थापन केले. तर इ. स. १९२१ मध्ये देवांग कोष्टी बोर्डिंग चालू केले. अशी एकूण सुतार बोर्डिंग वेळीच चार बोर्डिंग स्थापन करण्यात आली.

कोल्हापूर बाहेरील विद्यार्थी :

शाहू राजांनी आपल्या संस्थानात २० बोर्डिंग काढले पण त्यावेळेस त्यांची प्रेरणा घेऊन कोल्हापूर बोर्डिंगचा आदर्श घेवून महाराष्ट्रात अहमदनगर, नाशिक, नागपूर येथील वसतिगृहांना राजांनी मदत केली.

समारोप :

शाहू महाराजांच्या शिक्षण प्रणालीच्या प्रसाराचे मार्ग शोधता त्यांनी स्थापन केलेली कोल्हापूर संस्थानातील बोर्डिंग, सहाय्य (आर्थिक) मिळालेली बोर्डिंग महाराजांच्या नितांत प्रेमाची, अविरत परिश्रमाची स्मारके आहेत. विद्यार्थी वसतिगृह स्थापन करावे हे कोल्हापूरचे विशेष आहे. तेथे वसतिगृहांची जितकी संख्या आहे तितकी दुसऱ्या ठिकाणी क्वचितच असतील. त्यांनी स्थापन केलेल्या वसतिगृहांत व कोल्हापूर बाहेरील वसतिगृहात हा मोठा फरक आहे की त्यातून घडलेला बहुजन समाज राजकीय व सामाजिक क्षेत्रात नेतृत्व करतांना दिसतो. गरिबातल्या गरिबाला शिक्षण मिळाले, शिष्यवृत्त्या मिळाल्या, अनेक सुखसोयी, सुविधा व सवलती मिळाल्या. राजर्षींनी आपल्या कार्यासंबंधी म्हटले की, ''मी मागासलेल्या जातीच्या शिक्षणासाठी खास शिष्यवृत्त्या ठेवून, त्यांना निरनिराळ्या बोर्डिंग काढून दिली. माझ्या २५ वर्षाच्या प्रयत्नाचे आता कोठे सुपरिणाम दिसू लागलेले आहेत. A lamp can light another lamp" या विचाराप्रमाणे प्रत्येक जाती-जमातीसाठी वसतिगृहे काढली. राजर्षी शाहूंनी लावलेले रोपटे (वसतिगृहाचे) कर्मवीर भाऊरावांच्या काळात वटवृक्षात रूपांतर झाले. राजर्षी शाहूंनी सुरू केलेली वसतिगृह स्थापनेची चळवळ ही बहुजन समाजाच्या शिक्षणाचे प्रवेशद्वार ठरले आहे.

संदर्भग्रंथ सूची :

१. करवीर सरकार गॅझेट, २ एप्रिल १८९४
२. तत्रैव
३. प्राचार्य, रा. सु. भगत., पृ. १७
४. डॉ. कावलेकर के. के., नॉन ब्राह्मीण मुहमेंट इन साऊर्थन इंडिया, पृ. २८
५. प्रा. रा. तु. भगत, पृ. २२-२३
६. गर्गे एस. एम., करवीर रियासत, पृ. ५९२
७. प्रशासकीय अहवाल, १८९३-९४,

८. कोल्हापूर गव्हेंमेंट गॅझेट, २७ सप्टेंबर १८९५
९. सूर्यवंशी कृ. गो. पृ. १३३
१०. श्री. उदाजी मराठा वसतिगृह कोनशिला समारंभ, नाशिक ता. १५ एप्रिल १९२०
११. श्याम येडेकर – छ. शा. भाषणे, पृ. ६३
१२. आर्यवंशीय ज्ञानवर्धक समाज, ५ वी परिषद, दि. १५ ऑगस्ट १९२०
१३. राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, पृ. ६८
१४. प्रशासकीय अहवाल, १९१२-१३
१५. तत्रैव, १९२१-२२
१६. शा. गौरव ग्रंथ, पृ. ६५
१७. प्रशासकीय अहवाल १९०७-१९०८
१८. श्याम येडेकर, छत्रपती शाहू भाषणे, पृ. ६२-६३
१९. तत्रैव, पृ. ८०
२०. शा. गौ. ग्रंथ, पृ. ७२
२१. तत्रैव, पृ. ७२
२२. तत्रैव, पृ. ७२-७३
२३. तत्रैव, पृ. ७३
२४. तत्रैव, पृ. ७३-७४
२५. तत्रैव, पृ. ७४
२६. तत्रैव, पृ. ७४
२७. शाहू आज्ञा पृ. १३/५/२१ किंवा १८/५/२१

Publish Research Article
International Level Multidisciplinary Research Journal
For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org